PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aai
Year: 1981

Song: Hi kavali kavali paan me
Lyricist: Jagdish Khebudkar

ही कवळी कवळी पानं मी वेचली
देठ खुडून अलगद अशी मांडीवरी पुसली
घालून मसाला लवंग वर खोचली
लाज लाजून देते सजणा
घोळ घोळूनी खावा
आ...
देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा

अगं बाई सोडा की हात
अगं बाई सोडा की हात
बरं नव्हं चार चौघात
बरं नव्हं चार चौघात
मला कसंसं होतंय आत
मला कसंसं होतंय आत
डोळे रोखूनी नजर भेटीचा
डोळे रोखूनी नजर भेटीचा
मला इशारा द्यावा
हां देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा

पान भलतंच दिसतंय चढलं
अहो पान भलतंच दिसतंय चढलं
भान माझं ही आता उडलं
हो भान माझं ही आता उडलं
असं कसं हे विपरीत घडलं
असं कसं हे विपरीत घडलं
चोर पावली यावं महाली
चोर पावली यावं महाली
दार बेतानं लावा
अहो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा

काय विड्यानं किमया केली
काय विड्यानं किमया केली
त्याची नशा मला की आली
त्याची नशा मला की आली
ओठाची रंगली लाली
ओठाची रंगली लाली
असा कसा गं मदन राजानं
असा कसा गं मदन राजानं
केला गनिमीकावा
हां देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
देते विडा मी लाडे लाडे घ्यावा
हो देते विडा मी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*